Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

०७ /२०२६

**विषय - शिवाजी विद्यापीठाच्या इमारतीमध्ये व विद्यापीठ परिसरात कालबाहय/अनावश्यक माहितीचे फलक (डिजिटल बोर्ड) काढणेबाबत..**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स, अधिकारी, प्रशासकीय सेवकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध इमारतीमध्ये व विद्यापीठ परिसरात विविध कार्यक्रमाचे/कार्यशाळेचे तसेच विविध अभ्यासक्रम व प्रवेश प्रक्रीया इ. माहितीचे फलक (डिजिटल बोर्ड) संबंधित अधिविभाग/विभागामार्फत लावले जातात. परंतु नियोजित कार्यक्रम/कार्यशाळा झालेनंतर किंवा कालबाहय/अनावश्यक माहितीचे फलक (डिजिटल बोर्ड) संबंधित अधिविभाग/प्रशासकीय विभाग काढून घेत नाहीत. असे निदर्शनास येत आहे.

विद्यापीठ परिसर सुशोभित, शिस्तबध्द, व सुरक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता संबंधित अधिविभाग/प्रशासकीय विभागांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) विद्यापीठात नियोजित कार्यक्रम/कार्यशाळेच्या अनुषंगाने लावलेले फलक (डिजिटल बोर्ड) कार्यक्रम/कार्यशाळा झालेनंतर लगेच संबंधित अधिविभाग/विभागांनी काढून घ्यावेत.

२) विद्यापीठ परिसरात किंवा विविध इमारतीमध्ये विविध अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रीया इ. माहितीचे मुदत संपलेले/अनावश्यक/कालबाहय झालेले फलक (डिजिटल बोर्ड) संबंधित अधिविभागांनी तात्काळ काढून घ्यावेत.

३) सुरक्षा विभागाने देखील विद्यापीठाच्या इमारतीमध्ये व परिसरामध्ये कालबाहय/अनावश्यक माहितीचे फलक (डिजिटल बोर्ड) निदर्शनास आलेस संबंधित विभागास सदर फलक काढून घेणेबाबत सुचित करावे.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**जा.क्र. आस्थापना/** ९२
**दि.** 16 JAN 2026

**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स. प्रशासकीय अधिकारी व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधीष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) सुरक्षा विभाग - उपरोक्त प्रमाणे आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

**विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे.**